# जाहीर नोटीस

## प्रमुख जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की,......

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी झेरॉक्स रुम येथील शार्प कंपनीचे **Sharp BP-30M35** झेरॉक्स मशिन करिता **Drum Unit, Drum Roller, Developer, Pick up roller** हे पार्ट्स बदलणे आवश्यक आहेत.

तरी ज्या कोणाला वर नमुद केलेप्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी झेरॉक्स रुम येथे असलेले शार्प कंपनीचे **Sharp BP-30M35** झेरॉक्स मशिन करिता आवश्यक असलेले **Drum Unit, Drum Roller, Developer, Pick up roller** हे पार्ट्स उधारीने योग्य दरात पुरविणे शक्य असेल, त्यांनी दरपत्रके (निविदा) खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासून दहा दिवसांचे आत म्हणजेच दिनांक ०६/०८/२०२६ पर्यंत सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

## दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे. त्यामध्ये कर, वस्तुची किंमत इत्यादीबाबी स्वतंत्र नमुद कराव्यात. तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटरहेडवर SGST/CGST क्रमांक नमुद करावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

२. सदर लखोटयावर जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे **Sharp BP-30M35** झेरॉक्स मशिन दुरुस्ती बाबतचे दरपत्रक असे नमुद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

४. सर्वात कमीत कमी दराने दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत येणारे **Drum Unit, Drum Roller, Developer, Pick up roller** हे पार्ट्स ओरिजिनल असावेत व चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. सदरचे पुरविणेत आलेले पार्ट्स खराब निघाल्यास ते पुन्हा नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

६. सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयाच्या https://ratnagiri.dcourts.gov.in या संकेतस्थळावरती व या न्यायालयाचे नोटीस बोर्डावरती प्रसिध्द करणेत आलेली आहे.

७. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी, झेरॉक्स रुम येथील **Sharp BP-30M35** झेरॉक्स मशिनचे पुरविणेत येणारे पार्ट्स हे प्रत्यक्ष जागेवर येवून बसवून देणे बंधणकारक आहे त्याचा वाहतुकीचा वेगळा खर्च आकारता येणार नाही किंवा मागणी करता येणार नाही.

८. महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

९. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दि. २८/०७/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI

डिस्ट्रिक्ट कोर्ट, रत्नागिरी

**प्रभारी प्रबंधक,**

दिनांक— २८/०७/२०२६ **जिल्हा न्यायालय, रत्नागिरी**

म.जा.क्र. वित्त/४६६४/२०२६
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक— २८/०७/२०२६

**<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी—</u>**

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.
३. मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, रत्नागिरी.
४. मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.
५. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
६. मा. तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी.
७. नगरपरिषद, रत्नागिरी.